Estd. 1962
NAAC'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## प रि प त्र क

**विषय: करोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेबाबत**

**संदर्भ :१. मा.उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१४ मार्च,२०२० रोजीचे मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अग्रेषित केलेले पत्र**

**२. मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय यांचे दि. १४ मार्च,२०२० रोजीचे तातडीचे पत्र**

**३. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांची दि. १४ मार्च,२०२० रोजीचे पत्र**

**४. विभागीय सहसंचालक (उ.शि.), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे दि. १५ मार्च,२०२० रोजीचे पत्र**

**५. मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर जिल्हा यांचे दि. १३.३.२०२० रोजीचे आदेश**

उपरोक्त विषय व संदर्भांकित आदेशांन्वये सर्व संबधितांना कळविण्यात येते की, शासनाने करोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दि. १३ मार्च, २०२० पासून लागू करून अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्यास अनुसरून करोना विषाणू चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या दृष्टीने खालील प्रमाणे दि.१५ मार्च २०२० ते दि.३१ मार्च २०२० या कालावधीसाठी आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. विद्यापीठातील सर्व अधिविभागातील अध्यापनाचे कामकाज दि. १५ मार्च, २०२० पासून दि. ३१ मार्च, २०२० अखेर बंद राहील.
२. सर्व अधिविभागातील सर्व नियोजित चर्चासत्रे, कार्यशाळा, अधिवेशने आणि क्रिडा स्पर्धा दि. ३१ मार्च, २०२० पर्यंत पुढे ढकलण्यात याव्यात.
३. विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रामध्ये दि. १६ ते २३ मार्च,२०२० या कालवाधीत आयोजित करण्यात आलेले आरोग्य तपासणी शिबीर पुढे ढकलण्यात आले आहे.
४. सर्व अधिविभागातील विद्यापीठीय अंतिम प्रात्याक्षिक, तोंडी व लेखी परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच होतील. परीक्षार्थी ने परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकिट) /ओळखपत्र सोबत बाळगावे.
५. सर्व अधिविभागातील पूर्वनियोजित सर्व अभ्यास सहली पुढे ढकलण्यात याव्यात अथवा रदद करण्यबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा.
६. प्रतिबंध उपाय योजनेच्या दृष्टीने विद्यापीठाच्या खालील सुविधा सदर कालावधीत बंद राहतील

- ग्रंथालय व सर्व वाचनकक्ष
- क्रीडा विभाग व मैदानावरील सर्व खेळप्रकार
- योगा वर्ग
- क्रिडा विभागातील व खुली व्यायामशाळा
- मुलांची व मुलींची सर्व वसतिगृहे *
- उपवने व उद्याने
- पाळणाघर
- कमवा व शिका योजनेची वसतिगृहे *

७. विद्यापीठ परिसरात सदर कालावधीत सकाळी व संध्याकाळी फिरावयास येणाऱ्या नागरिकांनी या कालवधीत फिरावयास येणे टाळावे.

८. विविध अधिकार मंडळांचे सदस्य, विद्यापीठ अधिकारी, शिक्षक व प्रशासकीय सेवक यांच्या वाहनांव्यतिरिक्त इतर सर्व वाहनांना प्रवेश निषिध्द करण्यात येत आहे.

९. सदर कालवधीत विद्यापीठाच्या अतिथीगृहा मध्ये अतिर्थींनी येण्याचे टाळावे.

१०. आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाहीत, याची संबंधितांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी तसेच विद्यापीठ परिसरातील विद्यार्थ्यांनी आवश्यकतेनुसार विद्यापीठ आरोग्य केद्रांशी संपर्क साधावा.

* ११. अपवादात्मक परिस्थितीत जे विद्यार्थी वसतिगृहात राहतील ते अनावश्यकरित्या विद्यापीठ परिसरात तसेच, शहरामध्ये फिरणार नाहीत आणि वसतिगृहमध्ये स्वत:ला सुरक्षित ठेवतील अशा स्पष्ट सुचना संबंधितांनी द्याव्यात.

१२. विद्यापीठातील शिक्षक/ शिक्षकेत्तर अधिकारी/ कर्मचारी/ रहीवाशी/विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी करोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाने सुचित केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनाची अंमलबजावणी करावी.

१३. या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागप्रमुखांनी अधिकच्या सुचना/मार्गदर्शन मा.कुलसचिव यांचेकडून प्राप्त करुन घ्याव्यात.

**(डॉ. विलास द. नांदवडेकर)**
कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/** 792

**दि.** 15 MAR 2020

**प्रति,**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, रेक्टर्स.
२) सर्व प्रशासकीय विभागप्रमुख.
३) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
४) सुरक्षा विभागप्रमुख
५) सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर संघटना
६) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

महाराष्ट्र शासन

<u>अत्यंत तातडीचे</u>

क्रमांक : संकिर्ण-२०२०/(सं.क्र.(११४/२०)/विशि-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दि. १४ मार्च, २०२०.

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय : राज्यात करोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**
**संदर्भ : सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५, दि.१४/०३/२०२०.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे सोबत जोडलेले संदर्भाधिन पत्र कृपया पहावे.

२. शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दि.१३/०३/२०२० पासून लागू करुन खंड-२, ३ व ४ मधील तरतुदींनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

३. करोना विषाणूचा होणारा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदींनुसार दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत संदर्भाधिन पत्राव्दारे सूचित करण्यात आले आहे.

४. तथापि या सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीच्या तसेच विश्वविद्यालयांच्या प्रात्यक्षिके व परीक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला आहे. तसेच आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही, यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना देखील संदर्भाधिन पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

५. त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की,उपरोक्त सूचना विचारात घेऊन उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी/अनुदानित/खाजगी शैक्षणिक संस्था/महाविद्यालये /अकृषी विद्यापीठे दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत आपल्या स्तरावरुन सर्व संस्थाप्रमुखांना तात्काळ सूचित करण्यात यावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(सतीश ज. तिडके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- माहितीस्तव तथा आवश्यकत्या कार्यवाही करिता,

१. कुलगुरु/कुलसचिव,सर्व अकृषि विद्यापीठे,महाराष्ट्र राज्य.
२. सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
३. कुलगुरू, सर्व अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
४. निवड नस्ती (विशि-१)

महाराष्ट्र शासन

अत्यंत तातडीचे

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉम्प्लेक्स बिल्डिंग, नवीन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
दिनांक- १४ मार्च २०२०

प्रति,

अपर मुख्य सचिव
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव, उच्च व तंत्रशिक्षण
मंत्रालय, मुंबई

आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण, पुणे
संचालक, शालेय शिक्षण, पुणे / उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई

विषय: राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत..

शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावलीही तयार करण्यात आली असून स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येत आहे.

करोना विषाणुचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

तथापि, या सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील १० व १२ च्या परिक्षा तसेच विश्वविद्यालयाच्या परिक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्या असाही निर्णय घेण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना संबंधीत संस्था प्रमुखास देण्यात याव्यात.

तरी उपरोक्तनुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व आस्थापनांना सूचित करण्यात यावे त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(डॉ. प्रदीप व्यास)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत विभागीय आयुक्त, (सर्व)
प्रत प्रधान सचिव (नगरविकास - २) मंत्रालय, मुंबई
प्रत आयुक्त, महानगरपालिका, (सर्व)

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३.

क्र.उशिस/कोरोना/मवि-१/२०२० / ३७७४ दिनांक-१४/०३/२०२०.

ईमेलद्वारा/अतितात्काळ

14 MAR 2020

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.

विषय- राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत...

संदर्भ- शासनपत्र क्र.संकीर्ण-२०२०/(सं.क्र.) /(११४/२०)/विशि-१, दिनांक १४ मार्च २०२०.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन पत्राची प्रत सोबत जोडली आहे. अवलोकन करावे.

शासनाने करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतूदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालीका, सर्व नगरपालीका व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना व नियमावली मधील तरतुदीनुसार दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद टेवण्याबाबत संदर्भाधिन पत्रान्वये सुचित करण्यात आलेले आहे.

तथापि या सर्व महानगरपालीका, सर्व नगरपालीका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या तसेच विश्वविद्यालयांच्या प्रात्यक्षिके व परीक्षा विहित वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला आहे. आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याच्या सुचना देखील सार्वजनिक आरोग्य विभागाचे पत्र दिनांक १४/०३/२०२० नुसार देण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त सुचना विचारात घेऊन उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व महानगरपालीका, सर्व नगरपालीका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे आणि शासकीय/अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत, विद्यापीठाच्या प्रात्यक्षिके व परीक्षा विहित वेळापत्रकानुसार घेणे, त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता घेणे याबाबतच्या सुचना आपल्या अधिनस्त सर्व महानगरपालीका, सर्व नगरपालीका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे आणि शासकीय/अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालयांना देण्यात याव्यात.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- कुलसचिव, सर्व महानगरपालीका, सर्व नगरपालीका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील अकृषि विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे./ स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे.

प्रत- प्राचार्य, सर्व महानगरपालीका, सर्व नगरपालीका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये.

प्रत- मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव.

प्रत- मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना माहितीस्तव सादर.

D:\March 2020\Coronavirus.docx

# महाराष्ट्र शासन
## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर -४१६ ००४
E-mail: jdhekop@rediffmail.com

फोन क्र. : (०२३१) २५३५४००, २५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००


जा.क्र. : विसस/उशि/कोवि/२०२०/1130 दिनांक :- १५/०३/२०२०.

प्रति,

१. मा. प्राचार्य, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर,
२. प्र. प्राचार्य, श्री. म. ता. शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर,
३. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,
४. कुलसचिव, पदमश्री डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ, कोल्हापूर,
५. कुलसचिव, संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर,
६. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित,
कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र व विधी महाविद्यालये,
कोल्हापूर / सांगली / सातारा.

विषय :- राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत...

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/कोरोना/मवि-१/२०२०/३७७८, दि.१४/३/२०२०.
२. शासन पत्र क्र. संकिर्ण-२०२०/(सं.क्र.)/(११४/२०)/विशि-१, दि.१४/३/२०२०.

उपरोक्त संदर्भाधिन पत्रे सोबत जोडलेली आहेत, त्याचे अवलोकन करावे. त्यान्वये आपणांस कळविण्यात येते की, शासनाने करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि. १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदींनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच, महाविद्यालय व आयुक्त व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदींनुसार दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत संदर्भाधिन पत्रान्वये सूचित करण्यात आलेल आहे.

तथापि, या सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील इयत्ता १० वी व १२ वी च्या तसेच, विश्वविद्यालयांच्या प्रात्यक्षिके व परीक्षा विहित वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला आहे. आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाहीत यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याच्या सूचना देखील सार्वजनिक आरोग्य विभागाचे पत्र दि.१४/३/२०२० नुसार देण्यात आलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त सूचना विचारात घेऊन कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्हयातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे आणि शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित / मॉडेल डिग्री महाविद्यालये दि. ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्यात यावीत. विद्यापीठाच्या प्रात्यक्षिके व परीक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेणे, त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाहीत यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्यात यावी.

15/3/20

विभागीय सहसंचालक, (उ.शि.),
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर, करिता

प्रत :- १. मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना माहितीस्तव सविनय सादर,
२. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर,

Scanned by CamScanner

अधिसुचना

सार्वजनिक आरोग्य विभाग,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकूल,
१० वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दि. १४ मार्च २०२०.

क्रमांक करोना २०२०/प्र क्र ५८/ आरोग्य ५ : ज्याअर्थी महाराष्ट्र राज्यात दिनांक १३ मार्च २०२० च्या अधिसूचनेनुसार, अधिसूचनेच्या दिनांकापासून साथरोग अधिनियम, १८९७ ची अंमलबजावणी सुरु झालेली आहे, त्याअर्थी साथरोग अधिनियम, १८९७ च्या खंड २, ३ व ४ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासन राज्यात करोना विषाणुमुळे (COVID 19) उदभवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी खालीलप्रमाणे नियम प्रसिध्द करीत आहे.

१. या नियमांना " महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२०" असे संबोधण्यात येईल.

२. "कोव्हिड १९" म्हणजे भारत सरकार व जागतिक आरोग्य संघटनेने परिभाषित केल्यानुसार सिव्हीअर ॲक्यूट रेस्पीरेटरी सिंड्रोम करोना व्हायरस २ ( सार्स कोव्ही २).

३. साथरोग अधिनियमाच्या खंड २ (१) नुसार आयुक्त, आरोग्य सेवा, संचालक, आरोग्य सेवा १, संचालक, आरोग्य सेवा २, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, सर्व विभागीय आयुक्त महसुल विभाग, सर्व जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करण्यात येत आहे व त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम असतील.

४. सक्षम प्राधिकाऱ्यांनी घोषीत केलेल्या सर्व शासकीय व खाजगी रुग्णालयात करोना विषाणु संशयीत रुग्णांची तपासणीसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात येईल.

५. सर्व शासकीय व खाजगी रुग्णालयांनी सदर रुग्णांची तपासणी करतांना त्यांनी करोना विषाणुबाधित इतर देशात प्रवास केला होता किंवा कसे याबाबत नोंदी घेतील. त्याचप्रमाणे सदर रुग्णांचा संपर्क संशयीत किंवा संसर्गग्रस्त व्यक्तीशी आल्याची नोंद ठेवण्यात येईल. वरीलप्रमाणे घेण्यात आलेली रुग्णांची माहिती तातडीने एकात्मिक रोग सर्वेक्षण केंद्र, पुणे तसेच संबंधीत जिल्हाधिकारी / आयुक्त, महानगरपालिका यांना सादर करणे आवश्यक राहील.

i. प्रवाशाने करोना बाधित प्रदेशात मागील १४ दिवसाच्या कालावधीत प्रवास केल्याचा इतिहास असल्यास व रुग्णास करोना बाधा झाल्याची लक्षणे नसल्यास त्यांना तपासणी दिनांकापासून

पुढील १४ दिवस स्वत:च्या घरात अलगीकरण करुन रहाणे आवश्यक राहील. स्वत:च्या घरात अलगीकरण करुन रहातांना त्यांनी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी अलगीकरणाबाबत दिलेल्या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करणे त्यांचेवर बंधनकारक असेल. केंद्र शासनाच्या अलगीकरणासंबंधीच्या सूचनांचे स्वत:च्या घरात अलगीकरणासाठी पालन न करणाऱ्या रुग्णांना राज्य शासनाने कार्यान्वित केलेल्या अलगीकरण कक्षात भरती करण्यात येईल.

ii. ज्या प्रवाशांना करोना बाधित प्रदेशातील प्रवासाचा इतिहास असेल व त्यांना कोव्हीड १९ संसर्गाबाबत निश्चित केलेल्या व्याखेनुसार रोगलक्षणे दिसत असतील तर त्यांना अलगीकरणाबाबत विनिर्दिष्ट उपचारपध्दतीनुसार शासकीय रुग्णालयातील स्वतंत्र विलगीकरण कक्षात भरती करण्यात यावे व त्यांची कोव्हीड १९साठी प्रयोगशाळा तपासणी व औषधोपचार सुरु करण्यात यावा.

सदर अलगीकरण व विलगीकरण सूचनांमध्ये केंद्र शासनाच्या सूचनेनुसार वेळोवेळी झालेले बदल लागू राहतील.

६. कोणत्याही व्यक्तीस / संस्था / संघटनांना कोव्हीड १९ बाबत कोणत्याही प्रकारच्या अफवा, अनधिकृत माहिती ईलेक्ट्रॉनिक किंवा सोशल मिडीयाच्या माध्यमातून पसरविण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, संचालक, आरोग्य सेवा, मुंबई, संचालक, आरोग्य सेवा, पुणे व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांचेमार्फतच अधिकृत माहितीचे प्रसारण करण्यात येईल. याबाबतची कोणतीही अनधिकृत माहिती अथवा अफवा पसरविणाऱ्या व्यक्ती अथवा संस्था अथवा संघटना या कायद्यान्वये कायदेशिर व दंडनिय कारवाईस पात्र राहील.

७. आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांनी प्राधिकृत केलेल्या प्रयोगशाळेमधूनच कोव्हीड १९ बाबतच्या नमुने गोळा करण्यात येतील व भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांनी प्राधिकृत केलेल्या प्रयोगशाळांमधूनच या नमुन्यांची तपासणी केली जाईल.

८. मागील १४ दिवसांत ज्या व्यक्ती करोना बाधित देशातून प्रवास करुन आलेल्या असतील त्यांनी स्वत:हून याबाबतची माहिती करोना नियत्रणासाठीचा राज्य नियंत्रण कक्ष (०२०-२६१२ ७३९४), एकात्मिक रोग सर्वेक्षण प्रकल्प कक्ष (०२०-२७२९ ००६६) किंवा टोल फ्रि क्रमांक १०४ किंवा यासाठी

प्राधिकृत अधिकाऱ्यांनी दिलेल्या दुरध्वनी क्रमांकावर कळविणे आवश्यक राहील जेणकरुन त्या अनुषंगाने आवश्यक उपचारात्मक व प्रतिबंधात्मक उपाययोजना प्राधिकृत अधिकारी आयुक्त, आरोग्य सेवा व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, संचालक, आरोग्य सेवा, मुंबई, संचालक, आरोग्य सेवा, पुणे व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांचेमार्फतच त्यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये करतील.

९. वरीलप्रमाणे साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ नुसार प्राधिकृत अधिकारी यांना प्रवाश्यांचे अलगीकरण व जागतिक आरोग्य संघटना किंवा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय यांनी कोव्हीड १९ बाधित रोग व्याखेत नमूद केलेली लक्षणे असल्यास सदर संशयीत रुग्णांना शासकीय रुग्णालयातील विलगीकरण कक्षात भरती करण्याचे अधिकार राहतील. अलगीकरण किंवा रुग्णालयात विलगीकरणास मज्जाव / प्रतिबंध / अडथळा आणणाऱ्यांविरुध्द सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत भारतीय दंड संहितेच्या कलम १८८ नुसार कारवाई करण्यात येईल.

१०. एखाद्या भौगोलीक क्षेत्र उदाहरणार्थ गांव, शहर, तालुका, वॉर्ड, कॉलनी इत्यादी मध्ये कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव / उद्रेक आढळल्यास अशा उद्रेकजन्य क्षेत्राबाबत खाली नमूद केलेल्या तसेच प्रसंगानुसार आवश्यक असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त सक्षम प्राधिकारी असतील. अशा भौगोलिक क्षेत्रांच्या बाबतीत -

अ) क्षेत्र प्रतिबंधीत करणे

आ) क्षेत्रातील नागरीकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधीत करणे

इ) क्षेत्रातून वाहनांचे आवागमन प्रतिबंधीत करणे

ई) क्षेत्रातील शाळा, कार्यालये, सिनेमागृहे, नाट्यगृहे, जलतरण तलाव, व्यायामशाळा, गर्दी टाळण्याच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार सामुदायीक कार्यक्रमास प्रतिबंध करणे

उ) कोव्हीड १९ बाधीतांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सर्वेक्षण करणे

ऊ) संशयीत व त्यांचे संपर्कातील व्यक्तींचे आवश्यकतेनुसार रुग्णालयात विलगीकरण करणे

ए) शासकीय किंवा खाजगी इमारत / मत्ता अलगीकरणासाठी आवश्यकतेनुसार नामनिर्देशीत करणे

ऐ) कोव्हीड १९चा प्रादुर्भाव व प्रतिबंध करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या मार्गदर्शक उपायोजना व सूचनांची अंमलबजावणी करणे

जिल्हाधिकारी / महानगरपालीका आयुक्त यांना अशा क्षेत्रामधील सर्व शासकीय विभाग / संस्थांच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या सेवा किंवा निर्देशीत करतील अशी कोणत्याही व्यक्तीच्या सेवा कोव्हीड १९ या रोगाचे नियंत्रण / प्रतिबंधात्मक / आपत्कालीन उपाययोजना करण्याचे कामासाठी आवश्यकतेनुसार अधिग्रहीत करता येतील.

११. कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा संघटना यांनी या नियमावलीतील नियमांचे उल्लंघन केल्यास ते भारतीय दंडसंहिता ( ४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ नुसार दंडनिय / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील व या नियमावलीनुसार प्राधिकृत अधिकारी उपरोक्त नुसार व वेळोवेळी शासनाने या नियमानुसार दिलेल्या सूचनांचे उल्लंघन करणाऱ्याविरुध्द दंडनिय कारवाई करण्यास सक्षम असेल.

१२. या नियमावलीची अंमलबजावणी करणाऱ्या प्राधिकृत अधिकाऱ्याविरुध्द कोव्हीड १९चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सदभावनेने केलेल्या किंवा करण्यात येणाऱ्या कृतीबद्दल अंमलबजावणीच्या अनुषंगाने अन्यथा दोषी नाही तोपर्यंत कोणतीही कायदेशिर कारवाई अथवा गुन्हे दाखल करता येणार नाही.

१३. सदर नियमावली ही अधिसूचना निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येईल व अधिसूचनेच्या दिनांकापासून पुढील एक वर्ष किंवा आवश्यकतेनुसार पुढील आदेशापर्यंत अस्तित्वात राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने

(डॉ. प्रदीप व्यास)
शासनाचे प्रधान सचिव

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा. मंत्री (आरोग्य), मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री (आरोग्य) मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुबई
९. सर्व विभागीय आयुक्त

१०. जिल्हाधिकारी (सर्व)

११. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१३. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव

१४. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई / पुणे

१५. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)

१६. सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)

१७. उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)

१८. जिल्हा शल्यचिकित्सक (सर्व)

१९. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)

२०. जिल्हा हिवताप अधिकारी सर्व

२१. सर्व मंत्रालयीन विभाग

२२. सर्व सह सचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

२३. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्विय सहायक

२४. सर्व कार्यासन अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

२५. निवड नस्ती-आरोग्य ५